: प्रकरण तिसरे :

# रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील व्यक्तिरेखा

प्रकरण तिसरे :

# रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील व्यक्तिरेखा

## ३.१. प्रास्ताविक :

ह्या तिसऱ्या प्रकरणात बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील व्यक्तिरेखांचा विचार करावयाचा आहे. हा विचार आशयाच्या अनुषंगाने करावा लागतो. कथा आणि कांदबरी हे दोन्ही वाङ्मयप्रकार भिन्न भिन्न स्वरूपाचे आहेत. कादंबरीत व्यक्तिचित्रणाचा आवाका खूप मोठा असतो तिच्यातून व्यक्तीचा समग्र विकास चित्रित होतो. तसेच तिच्यातून एकापेक्षा जास्त व्यक्तिरेखा चित्रित करता येतात. प्रमुख व्यक्तिरेखा व गौण व्यक्तिरेखा असा तिचा आवाका असतो. कथेच्या बाबतीत हा आवाका मर्यादित आणि संकुचित असतो. एकाच कथेत अनेक व्यक्तींचे चित्रण केल्यास त्या कथेचा परिणाम कमी होतो. त्यासाठी कथाकाराला एकाच व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्याभोवती आपली कथा केंद्रित करावी लागते. नायकाशिवाय इतर व्यक्तिरेखांचे स्वभावदर्शन करावयाचे असल्यास ते झटपट आणि शब्दाच्या कमी योजकतेत कथाकाराला रंगविता आले पाहिजे, नाही तर कथेतील मूळ व्यक्तिरेखेकडे, म्हणजे नायक किंवा नायिका ह्यांच्याकडे त्याचे दूर्लक्ष होते. त्यामुळे कथा ह्या घटकाला असणारी अनेकविध परिमाणे साकल्याने उपयोगात आणता येत नाहीत. कथेच्या मर्यादित आवाक्यामुळे अनुभवाच्या विशिष्ट रूपाशी निगडीत असणारे मोजकेच संदर्भ सूचित झालेले असतात.

कथेमध्ये व्यक्तिरेखाटनाला खूप महत्त्व असते. कारण कथेचा विकास व्यक्तीच्या कृतीच्या माध्यमातून होत असतो. कथेतील व्यक्तिरेखाच कथेतून व्यक्त होणारा आशय अधिक स्पष्ट करीत असतात. कथाकाराच्या अनुभवविश्वातून आलेल्या व्यक्तिरेखा कथेची संपन्नता वाढवित असतात. कथेचा विकास हा कथेतील व्यक्तिरेखा आणि प्रसंग ह्यांच्या साहाय्याने होत असतो. त्यामुळे कथेत उत्कंठा निर्माण होते, कथानकास गती मिळते, कथेत आकर्षकता निर्माण होते आणि ह्या व्यक्तिरेखा कथेचा आशय व्यक्त करून तो वाचकापर्यंत पोहोचवत असतात. म्हणून कथेमध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखांचे योग्य आणि मार्मिक दर्शन घडविणे आवश्यक असते. कथाकार ह्या दृष्टीने प्रभावशील असावा लागतो.

कथा जशी घटनाप्रधान, आशयप्रधान व अनुभवप्रधान असते; तशी ती व्यक्तिप्रधानही असतेच असते. घटनाप्रसंगांइतके, किंबहुना थोडेसे जास्तच महत्त्व कथेत व्यक्तीच्या स्वभावचित्रणाला असते. आज मानवाला समाजाची अधिकाधिक कल्पना येत आहे. त्यामुळे 'एक होता राजा त्याला दोन राण्या

होत्या.....', अशा धाटणीच्या कथा तो आज सांगत बसणार नाही, तर सर्वसामान्य माणसाच्या एखाद्या स्वभाववैशिष्ट्यावर, जीवन जगण्याच्या पध्दतीवर तो कथेची उभारणी करील. त्या व्यक्तीचा स्वभाव, त्याचे अंतर्मन ह्याचे चित्रण तो करील. ती व्यक्ती जिवंत स्वरूपात वाचकाच्या समोर उभी रहावी, असे कथाकाराचे प्रयत्न असतात. त्यासाठी एकाच व्यक्तीच्या स्वभावदर्शनावर किंवा अंतर्गत गुणावर त्याला लक्ष केंद्रित करावे लागते.

कथा आणि कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप वेगळे असले, तरी ह्या दोन्हीमध्ये अनुभव प्रत्ययकारी करण्यासाठी व्यक्तिरेखांचा उपयोग केलेला असतो. लेखकाची समग्र साहित्यकृतीतून आविष्कृत होणारी जीवनदृष्टी व्यक्तिचित्रणातून अधिक ठळकपणे आविष्कृत होते. त्यामुळे लेखकाच्या जीवनदृष्टीचा प्रत्यय त्याच्या साहित्यात चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा देत असतात. लेखकाच्या वैशिष्ट्यपूर्णतेचे विविध पैलू व्यक्तिरेखांच्या सामर्थ्यातून दिसत असतात. ती व्यक्तिरेखा परिपूर्णरीतीने चित्रित करणे, तिच्या स्वभावातील बारीक विशेष रंगविणे ही कथाकाराची सर्वात मोठी जबाबदारी असते. ही जबाबदारी कथाकारास पेलता आली नाही, तर व्यक्तिरेखांच्या जीवनचित्रणात जिवंतपणा येत नाही.

## ३.२. रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील व्यक्तिरेखा :

रा. रं. बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील व्यक्तिरेखांचा विचार करताना विवेचनाच्या सोयीसाठी त्यांनी चित्रित केलेल्या व्यक्तिरेखांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे:

१. विरहाच्या दाहकतेमुळे शोकाकुल होणाऱ्या व्यक्तिरेखा
२. पुत्रप्रेमासाठी तळमळणाऱ्या व्यक्तिरेखा
३. प्रादेशिक समस्यांशी झुंज देणाऱ्या व्यक्तिरेखा
४. मराठमोळेपण जपणाऱ्या व्यक्तिरेखा
५. राजकीय सत्तासंघर्षात इर्षेला पेटलेल्या व्यक्तिरेखा
६. श्रध्दा-अंधश्रध्दा जोपासणाऱ्या व्यक्तिरेखा
७. शोषक आणि शोषित व्यक्तिरेखा
८. बालमनोविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या व्यक्तिरेखा
९. सुशिक्षित बेकारीचे चटके सहन करणाऱ्या व्यक्तिरेखा
१०. मुके प्राणी

बोराडयांच्या 'पेरणी'(१९६२) व 'कणसं आणि कडबा'(१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील व्यक्तिरेखांचा विचार करता त्यांना भेटलेली माणसे त्यांनी हुबेहूब रंगवली, त्यांच्या डोळयातले रंग, ढंग त्यांनी अचूकपणे टिपले व त्याचबरोबर त्यांच्या अंतर्मनात खोलवर बुडी घेऊन त्यांच्या मनातील भावतरंग वाचकांना उलगडून दाखविले. सृष्टीतील इतर गोष्टींच्या वर्णनापेक्षा मानवी अंत:करणातील ज्या घडामोडी, ज्या घटना, जी वादळे निर्माण होतात, जे भावबंध निर्माण होतात; त्यांचे जिवंत दर्शन बोराडयांची कथा वाचकांना घडविते. आपल्या व्यक्तिरेखांची सुखदु:खे त्यांच्या अंत:करणातील भावभावना, ताणतणाव व त्यांच्या मनात उठणारे अनेक तरंग वाचकांसमोर उलगडून दाखविण्यात व वाचकांना त्या जीवन जगण्याच्या पातळीवरचा पुन:प्रत्ययाचा आनंद देण्यात बोराडयांची कथा खरी कसरत करते. त्या कथेतील वातावरणाची निर्मितीही त्या प्रसंगाला, नायकनायिकेला, त्याच्या स्वभाववैशिष्टयाला, त्याच्या दर्जाला शोभेशीच त्यांनी केली आहे. कथेचा भर प्रामुख्याने भाषाशैली व निवेदनावर ठेवून प्रमाणबध्द परिच्छदे लेखनात आणून वाचकांची मने त्यांनी जिंकून घेतली. मानवी मन ढवळून काढणारी ओघवती भाषा त्या त्या व्यक्तिरेखेच्या मुखी त्यांनी घातली. त्यासाठी त्यांनी व्यक्तिरेखांच्या मुखी साधी, सरळ, नैसर्गिक स्वरूपाची, जिव्हाळयाची आणि विषयाला अनुसरून भाषा वापरली. व्यक्तिरेखांबरोबरच मुक्या प्राण्यांनादेखील कथानायकत्व देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो.

बोराडयांनी आपल्या कथांमधून रेखाटलेल्या व्यक्तिरेखा त्यांच्या आसपासच्याच परिसरातील म्हणजे वैजापूर, औसा, निलंगा, सास्तूर व किल्लारी म्हणजेच मराठवाडयाच्या भू-भागातील आढळतात. ह्या मुलखावेगळया व्यक्तिरेखा संघर्षप्रधानतेमुळे अपयशी ठरून बहुतांशी हतबल झालेल्या दिसून येतात. साधारणपणे ह्या व्यक्तिरेखा दारिद्रयाशी, दुष्काळाशी व निसर्गाच्या दैवाधीनतेमुळे निर्माण झालेल्या समस्यांशी झगडताना बळी गेलेल्या दिसतात.

बोराडयांच्या स्त्रीव्यक्तिरेखा तर मूकपणे सर्व काही सहन करणाऱ्या व कष्ट आणि कष्टच उपसणाऱ्या दिसून येतात. त्या कुठेही बंड करताना दिसत नाहीत. उलट मूकपणे सर्व सहन करीत, विकलांग व हतबल झाल्याने शापित जीवन जगत असताना, कुटुंबासाठी रोजंदारीने जमीनदाराच्या शेतावर राबताना दिसतात. बऱ्याचशा व्यक्तिरेखांच्या स्वभाववैशिष्टयातून श्रध्दा, अंधश्रध्दा व दैववाद जोपासलेला दिसतो. मराठवाडी मातीत जन्मल्याने मराठवाडी मातीचे सर्व गुणदोष घेऊन ह्या व्यक्तिरेखा कथेत येतात व मराठवाडयाची प्रदेशवैशिष्टये व्यक्त करतात. म्हणून बोराडयांच्या व्यक्तिरेखा मराठवाडी मातीचा अस्स्लपणा आणि कसदारपणा व्यक्त करतात असे म्हणता येते.

बोराडयांनी आपल्या कथांमधून रेखाटलेल्या बहुतांश व्यक्तिरेखा ह्या साध्या, अशिक्षित, अडाणी, श्रधाळू, भोळयाभाबडया, मायाळू आणि दयाळू अशा आहेत. एखादीदुसरी व्यक्तिरेखा मात्र सुशिक्षित आढळून येते. ह्या व्यक्तिरेखा आपल्या वाटयाला आलेली सुखदु:खे सहजपणे स्वीकारून त्यांच्याशी एकरूप होतात. हे जीवन जगणारे नायक किंवा नायिका जीवनात कुठेही कण्हत, कुढत बसत नाहीत, तर जीवनात येणाऱ्या समस्यांना ते हसतहसत स्वीकरताना दिसतात. त्यांच्या बहुतेक व्यक्तिरेखा ह्या शेतावर राबणाऱ्या, शेतीवरील प्रेमात गुरफटलेल्या व निसर्गावर अवलंबून असलेल्या दिसतात. शेतकरी आणि शेतमजुर व त्यांचे मनोविश्व हा त्यांच्या कथालेखनातील मुख्य घटक आहे व त्याच्याभोवतीच त्यांची कथा आपले नाते गुंफत जाते.

बोराडयांच्या कथेतील व्यक्तिरेखा ही कुठेही सुटबुट घालून संचारताना दिसत नाही. ती कृषिजीवनाशी एकरूप झालेली दिसते. तिचा पोशाख, तिची बोली ही मराठवाडी रंगरूपाशी व स्वभावधर्माशी साजेशी अशीच आहे. बोराडयांच्या व्यक्तिरेखा ह्या डोक्याला दहावारी जरतारी पटका, कमरेला नऊवारी दाभणकाठी धोतर, अंगात पैरण व वर बाराबंदी अंगरखा, गळयात उपरणे आणि पायात बांधीव(आवाजी) जोडा घातलेल्या मराठमोळया गावरान रूपातच कथेत संचारतात. दुर्दैवाशी दोन हात करण्यात त्या क्वचित् प्रसंगी दैवाचा आधार घेत असलेल्या दिसतात. येथे त्या दुबळया आहेत, असे नाही; तर मुळातच त्या ईश्वर विषयक श्रध्दा जोपासणाऱ्या आहेत. बोराडयांनी गरीब, दीनदलित व दुबळया, तसेच साध्या सरळ व्यक्तींना, एवढेच नव्हे, तर मुक्या प्राण्यांनादेखील नायकत्व बहाल केले आहे.

बोराडयांनी व्यक्तिरेखांचे चित्रण व्यापक सहानुभूतीतून व मानवतावादी दृष्टिकोणातून केले आहे. निवेदन, संवाद आणि प्रसंग ह्याद्वारा ते तो प्रसंग व ती व्यक्तिरेखा जिवंत स्वरूपात वाचकांसमोर उभी करतात. त्यांच्या व्यक्तिरेखाटनाचा हा विशेष असल्याचे प्रथम दर्शनी जाणवते. त्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा'(१९९४) ह्या दोनकथासंग्रहांमधील व्यक्तिरेखांचा विचार करत असताना विवेचनाची सोय म्हणून वरील वर्गीकृत केलेले घटक व त्या घटकाच्या स्पष्टीकरणात येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्यांचा विचार आपण येथे करणार आहोत. वरील वर्गीकृत एकेका घटकामधील व्यक्तिरेखांचा स्वतंत्र विचार करताना त्या त्या घटकातील पुरूषव्यक्तिरेखा व स्त्रीव्यक्तिरेखा असाही विचार अभिप्रेत आहे.

## १. *विरहाच्या दाहकतेमुळे शोकाकुल होणाऱ्या व्यक्तिरेखा :*

कृषिप्रधानता आणि पितृसत्ताक कुटुंबपध्दूतीत वडील हेच कुटुंबप्रमुख आणि त्यांच्यानंतर थोरला मुलगा कारभारी होतो. हा कारभारीच घरातील सर्व व्यवहार पार पाडतो. 'कणसं आणि कडबा'(१९९४) ह्या कथासंग्रहातील 'उताराची वाट' या कथेमधील भिकाजी ह्या व्यक्तिरेखेवरून हे लक्षात येते.

### *भिकाजी*

कृषिप्रधान संस्कृतीत पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा वारसा चालवू पाहणारी ही व्यक्तिरेखा उतारवयात मुलाच्या हातात कारभार देऊन पत्नीशी बोलणेदेखील मुष्कील करून बसते व येथूनच भिकाजीच्या विरहाला प्रारंभ होतो. त्याची मुले दोघांना इस्टेटीप्रनाणे वाटून घेतात, गावाच्या दोन्ही टोकांना दोघांना नेऊन ठेवतात व एकमेकाचे तोंड न पाहण्याचा चंग बाधतात. येथून 'भिकाजी' व 'बायना' ह्यांच्यातील विरह वाढत जातो. भिकाजीस उतारवयात पत्नी जवळ असावी, असे वाटते, तर म्हाताऱ्याची काळजी करत बायना तिकडे झुरताना दिसते. पत्नी बायनाच्या वाटेकडे भिकाजी डोळे लावून तिची वाट पाहतो व तारूण्यातील एकाएका प्रसंगाला उजाळा देऊन बायनाच्या विरहाने व्याकूळ झालेला असतो. अखेर कथेच्या शेवटी बायना चोरून का होईना, भिकाजीला भेटण्यास येते, तेव्हा तिच्या हालचालीची चाहूल लागताच भिकाजी आनंदून जातो व विचारतो, "कोन हाय?", मनातलं दु:ख जाणवणार नाही, अशा बेतानं ती म्हणाली, "किती खंगलाववं" मलूल हसत भिकाजी म्हणाला, "तू लई दिसानी मला बगायलीस नव्हं का. त्यामुळं तसं वाटत असंल."[१] अशा प्रकारे भिकाजी पत्नीविरहाने दु:खी होतो व आपणहून मुलांना इस्टेट वाटून दिल्याचे दु:ख करीत बसतो, तर ते दु:ख सहन न झाल्याने 'बायना' सहज बोलते, "मग कुणाची चूक हाय तर, दोगा लेकांनी तुमाला-मला वाटून घेतलं तवा जरा नेट धरला असताव, तर कस्याला असं झालं असतं? कशाले आसले भोग नसिबाला आले असते?."[२] येथे बोराडे निवेदनकौशल्याच्या व संवादाच्या माध्यमातून भिकाजी आणि बायना हे दोघेही एकमेकाच्या विरहाने व्याकूळ झालेले दाखविण्यात यशस्वी ठरतात.

अशाच प्रकारची व्यक्तिरेखा 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'हुरडा' ह्या कथेमधून पहावयास मिळते.[३]

### *बाजी*

लग्न झाल्याने बेहोश आनंदात उडया मारणारा, परंतु पत्नी जवळ असूनदेखील तिच्याशी बोलता येत नाही म्हणून हताश होणारा हा बाजी आहे. कारण पत्नी अजून वयात आलेली नसते. येथेच

बाजीचा विरह असाहाय्य होतो. पत्नी वयात आली नाही, म्हणून इतर कोणताही मार्ग न अवलंबता योग्य त्या वयापर्यंत तो संयम बाळगतो. अचानक एक दिवस घरातील सर्वच जण थट्टेने वागतात, त्याचा पटका लपवतात; तेव्हा मात्र खऱ्या अर्थाने त्याचा विरह संपलेला असतो व त्याच आनंदात तो धावत शेताकडे पळत सुटतो. असा हा हुल्लड बाजी सखा कातळेला, ''आमच्या बी शेतात झाला की हुरडा.''[४] असे म्हणून धावत राहतो. येथे ही व्यक्तिरेखा शेती आणि शेतीविषयक प्रेमात गुरफटलेली दिसते. हुरडया सारख्या परिपक्व माध्यातून येथे बाजीची बायको परिपक्व म्हणजे प्रौढ झालेली बोराडे दाखवून देतात.

*रानबा*

'हुरडा' ह्या कथेतील आशयाप्रमाणेच 'हुंदका' ह्या कथेतील रानबाचे भावविश्व व त्याचा पत्नी-विरह पाहण्याजोगा आहे.[५] पत्नी हुंडयामुळे नाहेरी पाठविली आहे, रानबाला ती हवी हवीशी वाटते, तिच्या माहेरचे लोक पाठवायला तयार आहेत.परंतु व्याह्या-व्याह्यांमध्ये पैशामुळे भांडण झालेले आहे. आबा सून नांदवायला तयार नसतात.येथूनच रानबाचा विरह वाढत जातो. अखेर पत्नीविरहाचा कढ अनावर होऊन रानबा भावाला येसबाला, ''माझ्या बरोबरच्याला दोन दोन मुलं झाली'', असे तो म्हणतो.[६] येथे त्याचा विरह उफाळून येतो. येथे रानबाची भावनिक हेळसांड होते. पुरूष प्रधान संस्कृतीचा तो बळी ठरतो व पत्नी विरहामुळे अबोला धरून सबंध कथेत वावरतो.

अशा प्रकारे बोराडे ह्यांच्या भावनिक व मानसिक हेळसांड झालेल्या ह्या व्यक्तिरेखा संपूर्ण कथेत वाचकांचे लक्ष केंद्रित करून घेतात. ह्या सर्व व्यक्तिरेखा त्या त्या घटनाप्रसंगांमुळे, निवेदनकौशल्यामुळे आपले दुःख वाचकांना उलगडून सांगण्याचा प्रयत्न करतात. ह्या व्यक्तिरेखा भिन्नभिन्न स्वभावाच्या असल्या, तरी त्यांचे दुःख एकच आहे, हेच ह्या व्यक्तिरेखाटनातून बोराडे दाखवून देतात.

*२. पुत्रप्रेमासाठी तळमळणाऱ्या व्यक्तिरेखा :*

*आई*

बोराडयांच्या लेखनशैलीचे वैशिष्टयच असे आहे की, त्यांनी चित्रित केलेली प्रत्येक व्यक्तिरेखा स्वतःहून आपले दुःख सांगत आहे, असा वाचकांना सतत भास व्हावा. मुले नाहीत म्हणून तीळ-तीळ तुटणारे आईचे हृदय, एकुलत्या मुलाच्या काळजीने तळमळणारी माता व मूल नाही म्हणून नवससायास करणाऱ्या पुरूष व्यक्तिरेखा बोराडयांनी चित्रित केलेल्या आहेत. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणून 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'अभ्यास' ह्या कथेमधील सोन्याच्या आईची व्यक्तिरेखा हृदय हेलावून

सोडणारी आहे.[७] एकुलत्या एक मुलाने मोठे व्हावे, खूप शिकावे, आपला पांग फेडावा, अशी तिची अपेक्षा असते. खोडकर, लबाड अशा आपल्या मुलाला ती त्याच्या सर्व दोषांसह पोटात घेते. अशी ही आईची व्यक्तिरेखा ह्या कथेत उठावदारपणे चित्रित झालेली दिसून येते.

*ग्यानाकाका*

ही व्यक्तिरेखा थोडीशी दैववादी असल्याचे दिसून येते. वय सरत आले, तरी त्याच्या पोटी पोर होत नाही. जेवढे म्हणून उपाय आहेत, तेवढे सगळे करून ती थकते व शेवटी दैवावर हवाला सोडते. वंशाचा दिवा लागणार की नाही, ह्याचीच शंका मनात बाळगून हे ग्यानाकाका पुत्रप्रेमासाठी अख्खा जन्म तळमळण्यात घालवतात, ग्यानाकाका ह्या व्यक्तिरेखेचे चित्रण 'झाड' ह्या कथेमधून येते.[८] 'काळीज'[९] ह्या कथेमधील जयवंतराव जि.प.च्या निवडणुकीत निवडून येतात.परंतु राजकीय वातावरण तापलेले असल्याने विरोधी पार्टीचे उमेदवार त्यांना 'किडनॅप' करतात.संपतरावला मुलाला बरे नाही, हे कळताच त्यांचे पुत्रप्रेम जागृत होऊन ते एक कागद काढतात व आपला राजीनामा लिहून देतात.

अशा प्रकारे पुत्रप्रेमासाठी तळमळणाऱ्या व्यक्तिरेखा बोराडे ह्यांनी रेखाटल्या आहेत. येथे सोन्याची आई सोन्यासाठी जिवावर उदार होऊन कष्ट उपसताना दिसते, तर ग्यानाकाका दैवावर विश्वास ठेवून श्रीरंग्याची हातावरील फोडाप्रमाणे काळजी घेताता. ह्या स्वरूपाच्या कितीतरी व्यक्तिरेखा बोराडयांच्या कथांमधून दिसतात. 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहांमधील ही मुलखावेगळी माणसे चित्रित करताना त्यांनी कोणतीच कसर मागे राखली नाही. म्हणून ती जिवंत वाटत राहतात.

### ३. *प्रादेशिक समस्यांशी झुंज देणाऱ्या व्यक्तिरेखा :*

दुर्दैवाशी आणि दुष्काळासारख्या समस्यांशी सामना करताना बोराडयांना जी मुलखावेगळी माणसे भेटली, ती चित्रित करताना त्यांच्या स्वभाववैशिष्टयात कसल्याच उणिवा न ठेवता ती जशीच्या तशी, त्यांच्या सर्वगुणदोषांसह बोराडे ह्यांनी जिवंत केली. ओला आणि कोरडा अशा दोन प्रकारच्या दुष्काळाच्या तडाख्यात सर्वसामान्य जतनेचे कसे हाल होतात, ह्यांचे प्रातिनिधिक चित्रण बोराडे ह्यांनी 'अवर्षण' व 'पडझड' ह्या कथांमधील व्यक्तिरेखांमधून केले आहे.[१०]

*अण्णाराव*

'अवर्षण' ह्या कथेमधून दिसून येणारी ही व्यक्तिरेखा दुष्काळामुळे होणारे ग्रामीण भागातील जनतेच्या हाल, अपेष्टा व दुःख ह्यांना कुठेतरी पायबंद घालण्याच्या दृष्टीने कार्यशील असलेली दिसते. दुष्काळमुळे सर्व गाव अन्न व पाणी ह्यासाठी हतबल झालेले असताना अण्णाराव हे मगनच्या साहाय्याने

शिवराम मानकराच्या विहिरीचे पाणी गावासाठी मिळविण्याचा प्रयत्न करतात.हा मानकरमोठा खडुस असतो. तो म्हणतो, ''अण्णाराव, कस्याला उगं अवांतर बोलताव. माजा ऊस वाळत ठिवून मला पुऱ्या गावला पाणी द्यायला परवडायचं न्हाई, न्हाई म्हंजी नाई.''[११] ह्या समस्येतून मार्ग काडण्यासाठी अण्णाराव तहसीलदार ऑफिसकडून 'पाणी पुरवठा' टँकर उपलब्ध करून घेतात.

गावात टँकर येतो खरा पण तो अनेक समस्या घेऊन येतो. केवळ पाण्यासाठी लोकांना कामधंदे सोडून टँकरची वाट पहात बसावे लागते. अशी ही कथा सर्वस्वी अण्णारावाच्या भोवती फिरताना दिसते. अशा स्वरूपाच्या भीषण दृष्काळात गावाला सावरून घेण्याचे काम अण्णाराव करतात. एक दिवस शिवराम मानकराच्या वाडयाला आग लागते. तेव्हा अण्णाराव सामंजस्याची भूमिका घेऊन गावाला सांगतात, ''मानकराच्या वाडयाला आग लागलीय. पाण्याचा टँकर तिकडं घ्या. अगोदर आपल्याला ती आग विझवावी लागेल.''[१२] अशा प्रकारची ही व्यक्तिरेखा बोराडयांच्या निवेदन कौशल्याचा व भाषाशैलीचा एकएक सामाजिक पदर उलगडून दाखवते.

### *गोविंदा व सिमंता*

'अवर्षण' ह्या कथेत कोरडया दुष्काळाचे चित्रण आलेले आहे, तर ह्याच्या उलट 'पडझड' ह्या कथेत ओल्या दुष्काळाचे चित्रण आलेले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत होते. ह्याचे प्रातिनिधक चित्रण गोविंद आणि सिमंता ह्या व्यक्तिरेखांच्या चित्रणातून आलेले आहे.

गावावर ओला दुष्काळ कोसळल्यामुळे सारा गाव पावसाने घरात बसवून ठेवलेला असतो. रोजगार नाही, खायला अन्न नाही, ह्या परिस्थितीत सर्व गाव आहे. गोविंदा व सिमंतासुध्दा घरातच बसून असतात. अन्नासाठी गोविंदा हताश होतो. त्याला ओल्या दुष्काळात काम मिळत नाही. एकएकदिवस उपाशी राहण्याची वेळ त्याच्यावर येते. अशा संकटाला सामोरे जात असताना गोविंदा हतबल होतो. मात्र सिमंताच्या डोक्यात एक कल्पना सुचते. 'स्वत:च घराचं भिताड पाडायच व पडझडीच फारमं भरून देयचं', असे ती गोविंदाला सुचवते. या प्रनाणे मध्यरात्री ते दोघे मिळून हाताने घराची भिंत पाडतात व सरकारी कार्यालयात जाऊन पडझडीचा फॉर्म भरून देतात. परंतु त्याला पडझडीचे खूपच कमी पैसे दिले जातात.

दुर्दैवाशी दोन हात करणाऱ्या ह्या व्यक्तिरेखा बोराडयांनी साध्या व सोप्या भाषेतून चित्रित केल्या आहेत. ह्या दोन्ही कथांमध्ये नैसर्गिक समस्या आहे. ती म्हणजे 'दुष्काळ'. ह्या दुष्काळामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांची कशी वाताहत होते, ह्याचे चित्रण ह्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून होते.

संपूर्ण कथा ह्या व्यक्तिरेखांभोवती गुंफत जाते. त्यामुळे बोराडयांच्या व्यक्तिरेखा वाचकांशी सुसंवाद साधताना दिसतात.

### ४. *मराठमोळेपण जपणाऱ्या व्यक्तिरेखा :*

बोराडयांनी बहुतांश व्यक्तिरेखा ह्या मराठवाडा आणि मराठवाडयाचे मराठमोळेपण जपणाऱ्या अशाच चित्रित केलेल्या आहेत. त्यामुळे कथेची गुंफणदेखील ह्या घटकाला मध्यवर्ती ठेवूनच झालेली दिसून येते. मराठवाडी मराठमोळेपण जपणारे आबाराव 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'ताण' ह्या कथेमधून बोराडे चित्रित करतात.

*आबाराव*

मध्यमवर्गीय शेतकरी आणि शेतीवाडीवर मुलाबाळांप्रमाणे प्रेम करणारी ही व्यक्तिरेखा असून नित्याने चारदोनशे पाने खाऊन दहापाच गावातील लोकांना घेऊन डहाळजत गप्पा मारत बसणे, कोणाचा जावई रूसला, कोणाची लेक नांदत नाही, असे सर्व गावाचे प्रश्न त्यांच्यासमोर येत असत ह्या प्रश्नांचा स्वत:च्या घरातील प्रश्नाप्रमाणे ते विचार करत व त्यातून मार्ग काढत. आबारावांचे दैनंदिन जीवन असे असते. मध्यमवर्गीय शेतकरी जीवन आणि त्यातून त्यांनी जपलेले मराठमोळेपणच येथे अशा कथेमधून दिसते. प्रसंगी आपल्या जावयाची देखील फिरकी घेण्यास आबाराव हायगय करत नाहीत. हे वर्णन पहा: ''तुमाला थोडा राग आलेला दिसतोय, जावई बापू. पर बरं नव्हं असलं. माणूस बोलायला आलं, तर कराव्या त्याच्यासंग चार गोष्टी. एवढया लांबून तुमी येताव ते पावन्यासंगं चार गोष्टी कराव्या म्हणूनच येत असताल.'' आणि थोडं थांबून त्यांनी विचारलं,''का दुसऱ्या कशासाठी येताव?.''[१३] आबारावांच्या ह्या वागण्यातून त्यांनी जपलेले मराठमोळेपणच दिसून येते. मराठमोळा बाज घेऊन ही व्यक्तिरेखा सबंध कथेतून आपली हुकुमत गाजविताना दिसते.

''खानदान'' ह्या कथेमधील खानदानी घराण्यातील कमाचं लग्न जयसिंग्याशी ठरते. तो शेवंतासाठी पारावर बसतो, तेव्हा मुलीला मांडीवर डागलेले आहे, असे त्याला कोणीतरी सांगते. म्हणून जयसिंग्या लग्नाला काही मिनिटाचा अवधी असताना मुलगी पसंत नाही म्हणतो. त्यावेळी खानदानाची इज्जत वाचावी म्हणून जयसिंग्याशी करण्यात आलेली तडजोड पाहण्यासारखी आहे पहा: ''बापूसाहेबांनी परत त्याचे पाय धरले व असं न करण्याबद्दल विनवू लागले. मग गावातलेही चार लोक मध्ये पडले. मोठया मिनतवारीने त्यांनी जयसिंग्याची समजूत घातली. झालेल्या अपराधाबध्द्ल बापूसाहेबांनी जयसिंग्याची पाचीही बोट पिवळी करावी'',[१४] असे ठरते.

बोराडयांच्या कथेतून चित्रित झालेल्या बहुतेक व्यक्तिरेखा ह्या अधिक संयमी, धीरोदात्त व परिस्थितीने गांजलेल्या अशा रूपातच वावरताना दिसतात. ह्याचे कारण म्हणजे सततचे दारिद्र्यप्रवण आणि म्हणूनच अपमानित असे वाटयाला आलेले जीवन होय. ह्या व्यक्तिरेखा जीवनाला सामोरे जाताना बंड करून सहसा उठत नाहीत, तर प्रचलित रूढीपरंपरांचे पालन करण्यात सुख मानताना दिसतात. येथे आबाराव व जयसिंग ह्यांच्यासारख्या व्यक्तिरेखा आपल्या मराठवाडी रंगरूपाचा बाज सांभाळून राहताना दिसतात.

### ५. *राजकीय सत्तासंघर्षात ईर्षेला पेटलेल्या व्यक्तिरेखा:*

बोराडयांची कथा ग्रामसंस्कृतीचा जाणीवपूर्वक वेध घेताना दिसते. असा वेध घेताना ती वास्तवावर अधिक स्थिरावते. अशा वास्तवाचा वेध घेताना तेथील मानवी मन आणि त्या मनातील विविध स्तरांवरील भावांदोलने ती टिपते. अशा ग्रामवास्तवाचा वेध बोराडयांनी 'वेस' ह्या कथेमधून घेतला.[१५] रंगनाथराव ही व्यक्तिरेखा राजकीय डावपेच रचून गावावर सत्ता, हुकूमत गाजवित असलेली दिसते. ग्राम पंचायतच्या निवडणुकीमध्ये रंगनाथरावला खूपच रस आहे, तो स्वत: निवडणूक लढवत नाही. परंतु त्याची पार्टी निवडून आणण्यासाठी तो मोठे कष्ट घेतो. गावाचे राजकीय वर्तुळ त्याच्या हातात असते. कोणत्या माणसाचा कसा वापर करायचा, राजकीय डावपेचात त्याला कसा गुंतवून ठेवायचा , ह्यात त्याचा हातखंडा असतो. कोणी कोणता मार्ग अवलंबावा, हे तो चांगलेच जाणून असतो. म्हणूनच की काय, तो केरबा महाराला गावाचा सरपंच करतो. येथे त्याचा डाव ओळखू येतो. गावाच्या महारामांगाची मते कायम आपणास रहावी व केरबाची देखणी बायको आपल्याला रखेली प्रमाणे वापरावयास मिळावी, हाच त्याचा त्यामागे डाव असतो व त्यात तो सफल होतो. रंगनाथरावाच्या रूपाने ग्रामस्तरावरील राजकीय डावपेचच बोराडयांनी वाचकांना उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे, हे दिसून येते.

ग्राम पंचायतीपासून जि. प. व पंचायत समितीपर्यंत व कारखान्याच्या चेअरमनपासून विधानसभेपर्यंतच्या राजकीय हालचाली कशा गतिमान होतात, ह्याचे उत्तम उदाहरण म्हणून 'काळीज' ह्या कथेमधील दादासाहेब व 'पोतेरा' ह्या कथेमधील आबासाहेब साबळे ह्या व्यक्तिरेखा आवर्जून उल्लेख करण्याजोग्या आहेत.

#### *दादासाहेब*

दादासाहेब ही व्यक्ती आपले राजकीय अस्तित्व सहीसलामत ठेवण्यासाठी रोज नवीनच डाव मांडून बसलेली दिसून येते. जिल्हा परिषद तेवढी आपल्या हातात रहावी, म्हणून दादासाहेब जि.प.च्या

निवडणुकीला उभे राहतात व विरोधकांचा डाव उधळून लावतात. आपल्या सर्व मतदार सदस्यांसह विरोधकांच्या म्हणजे अवचितरावाच्या मतदारांनादेखील ते आपल्या बंगल्यात आणून ठेवतात. त्यांना हवं ते देतात त्यासाठी पाण्यासारखा खर्च करतात व एकही मतदार फुटणार नाही; ह्याची दक्षता घेतात. अशी ही दादासाहेबांची व्यक्तिरेखा मराठवाडयाचा राजकीय बोलपट आपल्या डोळयासमोर उभा करते. समकालीन राजकीय वातावरणात इर्षेने पेटलेली मंडळी राजकीय पटावर आपले अस्तित्व कसे टिकवून ठेवतात, हेच दादासाहेबाच्या व्यक्तिरेखेतून बोराडे ह्यांना दाखवून द्यावयाचे आहे. हा दादासाहेब निवडून आल्यानंतर मात्र मतदारांकडे डोळेझाक करतो, हेही समकालीन राजकीय वास्तव ह्या व्यक्तिरेखेतून बोराडे ह्यांनी आपल्यासमोर उलगडून दाखविले आहे.[१६]

उभ्या महाराष्ट्राच्या पाठीवर घडणाऱ्या राजकारणाचे व त्यातून इर्षेला पडलेल्या व्यक्तींचे चित्रण करण्यात बोराडयांच्या ''वेस'' व ''काळीज'' ह्या कथांमधील व्यक्तिचित्रणाएवढेच, किंबहुना थोडे जास्तच महत्त्व ''पोतेरा'' ह्या कथेमधील आबाराव साबळे ह्या व्यक्तिरेखेच्या चित्रणाला आहे.[१७]

*आबाराव साबळे*

शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदापासून विधान सभा सदस्यत्वापर्यंत मजल मारणारी ही व्यक्तिरेखा बोराडयांच्या इतर अनेक राजकीय कथासंभारातील व्यक्तिरेखांपेक्षाही थोडीशी वेगळीच आहे. भ्रष्टाचाराने पोखरलेला महाराष्ट्र व महाराष्ट्रातील दूधखुळी जनता आबाराव साबळेसारख्या इसमाला निवडून देऊन, कारखान्याचे चेअरमनपद त्याला मिळावे म्हणून पक्ष कार्यकारिणीकडे आग्रह धरते. त्यातून आबारावला चेअरमनपद मिळते पुढे कारखान्यावर हा आबाराव एकछत्री अंमल गाजवतो. राजकीय डावपेचात चातुर्याने वागणारा हा आबाराव जनतेची लयलूट करतो. कारखान्याच्या आसपासच्या मोकळ्या हातांना काम देण्याऐवजी तो त्यांचे हात गुंडगिरी व बाईबाटलीकडे वळवतो. प्रामाणिकपणाने आणि नेकीने वागणाऱ्यांना आबारावकडे थारा नसतो. सर्वसामान्य मतदारांचा प्रतिनिधी म्हणून सूर्याजी कारखान्यावर आबारावला भेटण्यास जातो. तेव्हा तेथील गर्दीपाहून तो दचकतोच व जवळ उभ्या असलेल्या एका इसमाला आश्चर्याने विचारतो, ''चेअरमनसाहेबांच्या ऑफिसजवळ आज एवढी गर्दी का आहे?,'' सूर्याजीला हळूच न्याहळत बघत तो इसम म्हणाला, ''म्हंजी तुमाला अजून ठावंच न्हाई का ?,'' ''काय?'' ''चेअरमन सायबाला आज आमदारकीचं तिकीट डिक्लेअर झालंय.''[१८]

येथे हे तिकीट आबाराव प्रामाणिक माणूस आहे म्हणून नव्हे; तर पक्षासाठी, पक्षप्रचारासाठी 'दोन नंबर' चा पैसा पुरविणारा मोठा मालदार आहे म्हणून दिले गेले आहे हेही ही कथा सूचित करते.

सूर्याजीला साखर कारखान्यात नोकरी देण्याचे आश्वासन मिळते. परंतु त्या बदल्यात निवडणुकीची एक जबाबदारी त्याच्याकडून पूर्ण करून घेतली जाते.अशा प्रकारची दिशाभूल करून निवडणूक लढविणारी राजकारणी मंडळी जनसामान्यांना कोणती वागणूक देतात, हे बोराडे ह्यांनी आबाराव साबळे ह्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून दाखवून दिले आहे.

६. *श्रध्दा - अंधश्रध्दा जोपासणाऱ्या व्यक्तिरेखा :*

ग्रामसंस्कृतीची रचना ही अधिक प्रमाणात निसर्गसन्मुख असते. म्हणून तेथील मानसविश्वात लोककथा, लोकगीते आणि त्यातून रूढ झालेल्या रूढी - परंपरा, प्रथा-संकेत, श्रध्दा - अंधश्रध्दा इ. बाबींना अधिक महत्त्व प्राप्त होते. अशा लोकसमज - संकेतांचा बोराडे कथा निर्मितीसाठी उपयोग करून घेताना दिसतात. ग्रामीण परिसरातील माणूस हा अशिक्षित, अडाणी असल्याने तो सत्य - असत्याचा फारसा शोध घेत नाही. म्हणून स्वप्नात दिलेल्या दृष्टांतांना महत्त्व प्राप्त होते, तर कावळाकावळीच्या लागणीलाही ह्या जीवनात वेगळाच अर्थ प्राप्त होतो. म्हणून मांत्रिक आणि भूत - पिशाच्च ह्यांना येथे स्थान असते. अशा अनेकविध श्रध्दा - कल्पनांचा वेध बोराडे ह्यांची कथा घेते.

'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील ''सांगावा'' व ''झाड'' ह्या कथांमधील व्यक्तिरेखांनी लोककथा - कल्पनांच्या आहारी जाऊन स्वत:चे भावविश्व उध्वस्त करून घेतलेले दिसते.[१९] 'सांगावा' ह्या कथेमधील तुकाची व्यक्तिरेखा अशा अंधश्रध्देची बळी गेलेली दिसते. तुकाचा मुलगा यंका ह्याने कावळा - कावळीची लागन पाहिली आहे, हे लक्षात येताच तुकावर काही अरिष्ट ओढवणार, ह्या भीतीने सगळा गाव गोळा होतो व अंधश्रध्देच्या जोखडात अडकून राहिल्याने एकएक संकेत पाळताना दिसतो. त्यातील एकजण बाबाजी म्हणतो, ''बरं तुका, आता बसून भागायचं न्हाई. लागाव आता पुढच्या तयारीला.'' ''कसं करावं ?.'' ''करायचं ते करावं लागतं. त्याच्यावर तेवढाच इलाज हाय उगं न्हाई वाडवडलापासून चालत आल.'' ''धाडावा का म्हार?.'' ''धाडावान्.त्यात कशाला हायगय?.''[२०] अशा प्रकारे अंधश्रध्देला हा समाज चिटकून बसलेला आहे. ह्या परिस्थितीत खोटा सांगावा सांगून घरावरील अनिष्ट टाळता येते, हा समज जपत आलेला दिसतो. अशा कथांना लोककथा आणि लोकसंकेतांचा आधार आहे. ह्या लोककथा - कल्पनांवरच येथील माणसाचे भावविश्व उभे आहे. त्यावर त्यांच्या रूढीप्रथा आधारलेल्या आहेत. ह्या रूढी-प्रथा एकूणच ग्रामजीवनाचे भावविश्व बनून राहतात. ह्याचे प्रत्ययकारी चित्रण बोराडयांनी तुकाच्या माध्यमातून केलेले आहे. हा तुका अंधश्रध्देवर जगणाऱ्या समाजाचे प्रातिनिधिक रूप घेऊन कथेत संचारतो, हे लक्षात येते.

''झाड'' ह्या कथेमधूनदेखील अंधश्रध्देवर विश्वास ठेवून जगणारी माणसे व त्यांची प्रातिनिधिक व्यक्तिरेखा म्हणून ग्यानाकाका हे पहावयास मिळतात. तारूण्याच्या तिसऱ्या प्रहरापर्यंत ग्यानाकाकांना मूलबाळ होत नाही. म्हणून ते हरेक नवससायास करतात. अचानक एक दिवस नरसोबा ग्यानाकाकांना स्वप्नात दृष्टांत देतो आणि ग्यानाकाकांना उद्देशून म्हणतो, ''मी तुझ्या शेतात आलोय, उन्हांत तळाया लागलोय्, मला तूं सावली कर, मी तुझा वंश वाढवीन.''[२१] दैवावर त्यांचा जबरदस्त विश्वास असल्याने हे स्वप्न घरातील सर्वांना सांगतात आणि त्याची प्रचिती म्हणून शेत धुंडाळत असता त्यांना खरोखरच नरसोबाची मूर्ती मिळते. ग्यानाकाका क्षणाचाही विलंब न लावता एक लेकुरवाळा ब्राम्हण बोलावतात आणि त्याच्या हाताने पिंपळाचे बीजारोपण करतात. बी रूजते आणि घरात श्रीरंग्याचा जन्म होतो. घरी मूल मोठे होऊ लागते, तसे रानात पिंपळाचे झाड फोफावू लागते. परंतु काही दिवसात पिंपळाचे झाड वाळायला लागते. तसा ग्यानाकाकाचा जीव तीळतीळ तुटू लागतो. इकडे रानात झाडाला काही लागले, ते सुकले की ग्यानाकाका श्रीरंग्याची काळजी घेऊ लागतात. अशा तऱ्हेने व्यक्त होणारी ग्यानाकाकाची व्यक्तिरेखा अंधश्रध्दा जोपासण्याच्या नादात श्रध्दा संकेतांना कशी बिलगून बसते, हेच दाखविण्याचा बोराडे ह्यांचा हा प्रयत्न येथे सफल झाला आहे, असे म्हणता येते.

अशा प्रकारे बोराडयांच्या अशा व्यक्तिरेखांनी लोककथा आणि लोकसंकेतांचा आधार घेतलेला आहे. ह्या रूढी - कल्पनांवरच तेथील माणसांचे भावविश्व उभे आहे. ह्या रूढीप्रथा एकूणच ग्रामजीवनाचे भावविश्व बनून राहिलेल्या आहेत, ह्याचा ह्या व्यक्तिरेखांच्या चित्रणामधून उत्कट प्रत्यय येतो.

### ७. *शोषक आणि शोषित व्यक्तिरेखा :*

बोराडे ह्यांची कथा अधिक प्रमाणात ग्रामीण मानसचित्रणात रमते. ग्रामीण माणसांच्या स्वभावाचे, वृत्तीप्रवृत्तीचे ती बारकाव्याने चित्रण करते. 'सत्यानाश' ह्या त्यांच्या कथेतून चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा ह्या शोषक आणि शोषित अशा स्वरूपाच्या आहेत, हे दिसून येते.[२२]

#### *बाबालाल*

शोषक व्यक्तिरेखा म्हणून 'सत्यानाश' ह्या सबंध कथेत बाबालाल ही व्यक्तिरेखा धुमाकूळ घालताना दिसते. रझाकारी अत्याचाराची पार्श्वभूमी व धर्मांध मुसलमान निझामी राजवटीची जात्यांध भूमिका ह्यामुळे अप्रत्यक्ष फूस मिळालेला हा माणूस गावकऱ्यांना सतत उपद्रव देतो. एरव्ही गावात वर्षानुवर्ष गुण्यागोविंदाने राहणाऱ्या बाबालालच्या वृत्तीत झालेला हा बदल आणि त्याने सुरूठेवलेला शोषणाचा सपाटा पाहण्या जोगा आहे. हा बाबालाल निझामी राजवटीचा गैरफायदा घेऊन

मराठवाडयातील जनतेला उपद्रव देतो, येथे ही व्यक्तिरेखा शोषक म्हणून ह्या कथेत संचारताना दिसते; तर शोषित म्हणून येथे रंगरावचे कुटुंबिय दिसून येते.

*रंगराव*

बाबालाल ह्या धर्मांध मुसलमानाने रंगरावाचे शोषण केलेले आहे. बाबालालच्या मारहानीमुळे मरणासन्न झालेले वासरू सोडवण्यास रंगराव जात नाही. कारण रंगरावला ते कमी पणाचे वाटते. रंगराव बाबालाल विषयी चिडतो, दु:खी होतो. परंतु येथे खरे दु:ख आहे ते बाबालालने मारून मारून मरणासन्न झालेल्या वासराच्या वेदनेचे व वासराच्या वेदनेच्या दु:खाने ढवळून निघालेल्या रंगरावच्या कुटुंबियाचे. सर्व कुटुंब 'रावळया' नावाच्या वासराच्या दु:खाने व्याकूळ होते. परिणामी ह्या कथेतील चित्रणातून जातीय तणावाचे पदर अव्यक्त राहतात. त्याऐवजी एका गावगुंडाने सरळमार्गी माणसाचा केलेला छळ, असे ह्या कथेतील व्यक्तिरेखांचे स्वरूप राहते. केवळ सुष्ट आणि दुष्ट ह्या संघर्षाच्या पारंपरिक चौकटीत ह्या व्यक्तिरेखा अडकून पडतात. येथे सुष्ट प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून रंगराव व दुष्ट प्रवृतीचे प्रतीक म्हणून बाबालाल हे दिसताहेत.

असेच 'कणसं आणि कडबा',[२३] (१९९४) ह्या कथेमधील आबाराव शेळके ह्या व्यक्तिरेखेचे चित्रण बोराडे शोषक म्हणून करतात. संपूर्ण नांदगाव ह्या गावावर दुष्काळाचे सावट पसरलेले असते. नांदगावचे शेतकरी अन्नपाण्यासाठी वनवन भटकत असतात. गावात अन्नपाण्याची सोय नसते. पण आबाराव शेळक्याच्या वाडयात मात्र भरपूर धान्य असते. जेथे माणसांना अन्नपाणी नाही, तिथे जनावरांचे काय? आबाराव दुष्काळात चारा-पाणी जवळ असतानाही शेतकऱ्यांना देत नाही. उलट नुसत्या चाऱ्यासाठी सर्व गावाचे बैल त्याच्या शेतावर राबत राहतात. शेतकऱ्यांच्या इस्टेटीदेखील लुबाडायला आबाराव कमी करीत नाही. बाबालाल मुसलमानाप्रमाणे आबाराव हाही दुष्ट प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून कथेत आलेला आहे. असा हा आबाराव तालुक्याला तहसील ऑफिसमध्ये, कोर्टकचेऱ्या, पोलीस ह्यांच्यामध्ये जबरदस्त वजन राखून आहे. त्यामुळे त्याचा त्रास सहन करणे, एवढेच नांदगावच्या शेतकऱ्यांच्या वाटयाला येते.

अशा प्रकारे शोषक आणि शोषित व्यक्तिरेखा रेखाटताना बोराडयांच्या लेखणीने त्या त्या व्यक्तिरेखांच्या गुणदोषात कसलीच कसर न ठेवता त्यांना जसेच्या तसे त्यांच्या गुणदोषांसह वाचकांसमोर आणले आहे.

## ८. बालमनोविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या व्यक्तिरेखा :

बोराडयांच्या कथांमधून आलेल्या बालमनाच्या चित्रणातील विविधता लक्षात घेण्यासारखी आहे. मराठी ग्रामीण कथाविश्वात बोराडयांच्या कथांमधून जेवढया सामर्थ्याने, जेवढया विविधतेने आणि जेवढया उत्कटतेने बालकांचे चित्रण आले आहे, तेवढया सामर्थ्याने,विविधतेने आणि उत्कटतेने इतरांच्या ग्रामीण कथांमधून ते क्वचित आलेले दिसून येते. वास्तविक बालमानसविश्व चित्रित करणे फारसे सोपे नसते. ह्याचे कारण असे की, बालमानसविश्वाबद्दल प्रौंढाचे काही समज - अपसमज असतात. ते नेमके टाळून केवळ बालमानसविश्व नेमके पकडणे, ही कलावंताच्या दृष्टीने तशी अवघड बाब असते.परंतु बोराडे ह्यांच्या बालमानसविश्वाचे प्रकटीकरण करणाऱ्या कथा पाहिल्या असता ही मानसचित्रे रेखाटताना त्यांच्या लेखणीने कोठेही अन्याय केलेला दिसत नाही.

बालमनाचे चित्रण करताना, केवळ बालमनाचे चित्रण करावयाचे आहे म्हणून बोराडे हे चित्रण करीत नाहीत; तर त्यांनी अनुभवलेल्या त्यांच्या आकलनांच्या ग्रामविश्वाच्या अनुषंगाने अगदी अपरिहार्यपणे येणाऱ्या बालकांच्या जीवनाचे चित्रण ते करीत जातात. हे चित्रण केवळ माहितीवजा अथवा रंजकतेकडे झुकणारे सहसा आढळत नाही. उलट बालमनाचे तळ शोधण्यात त्यांची कथा अधिक रमताना दिसते. म्हणून त्यांच्या कथेतून बालमनोविश्वाचे दर्शन हे बालमनाच्या विविध भावच्छटांचे चित्रण म्हणून येते.

'अभ्यास' ह्या कथेतील सोन्याची व्यक्तिरेखा येथे विशेष उल्लेखनीय आहे.[२४] आखुडक्या चड्डीतला हा 'सोन्या' खूपच कलंदर लहान वयातही अंगात भलतीच चतुराई असलेला असा आहे. आईच्या तर सहजासहजी हातावर तुरी ठेवून फसवून निसटत असतो. विधवा आईचा तो एकमेव आधार असतो. त्याने खूप शिकावे, मोठे व्हावे, आपला पांग फेडावा, ही त्याच्या आईची किमान अपेक्षा असते. हा बहाद्दर पोर भलतेच खोडकर असते. खेळातल्या 'म्होरक्या' ला 'तिकडं काय आलं' म्हणून वेडावून पळ तो काढतो. त्याच्या ह्या युक्त्या - प्रयुक्त्या म्हणजे बालमनाचा एक पैलूच आहे. ह्या पैलूचं दर्शन बोराडे सोन्याच्या व्यक्तिरेखेतून घडवितात. तसेच ह्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून बोराडे ह्यांनी ह्या कथेत सूचकता हा आणखी एक पैलू वापरला आहे. खेळातील म्होरक्याला झुकांडी देऊन हा सोन्या लपत - छपत थेट सोठाच्या मोरीजवळ जातो, जिथे सोठाची बायडी न्हात असते. येथे सोन्याचे बालमानसविश्व चित्रित करताकरताच ही कथा नकळतपणे बायडीचे तारूण्याच्या उंबरठयावरचे मानसविश्वही चित्रित करून जाते. 'रस्त्याच्या कडेकडेने तिचे अवघडून चालणे', त्याच बरोबर ती आंघोळ करीत असताना, चेष्टेने लुगडे पळवल्यावर 'छातीवर हात बांधून' लुगडयासाठी ओरडणे, हे

जसे तिच्या वयाचे प्रतीक आहे, तसे आंघोळीच्या वेळी तिची चेष्टा करणे, ही सोन्याच्या अजानवयाची स्वाभाविक वृत्ती आहे. अशा विविध पातळीवरील स्वभाववृत्तीचे आकलन आणि प्रकटीकरण बोराडे ह्यांनी अतिशय संयमाने, सामर्थ्याने आणि अतिशय सहजतेने केलेले दिसते.

अशाच स्वरूपाच्या व्यक्तिरेखा त्यांच्या 'भल्या घरचे पाहुणे', 'सांगावा' व 'झाड' ह्या सारख्या कथांमधून आढळतात. 'भल्या घरचे पाहुणे' मधील छगन अतिशय बेरकी आणि भाबडा आहे,[२५] तर 'सांगावा' मधील यंका कावळयाची लागण बघून अतिशय घाबरून बापाची आठवण काढून बसलेला दिसतो.[२६] आणि 'झाड' मधील श्रीरंग्या सतत आजारी पडून ग्यानाकाकांना सतत चिंतेच्या खाईत लोटतो.[२७] अशा प्रकारच्या बालव्यक्तिरेखा त्या त्या कथेमधून वाचकांच्या अंतर्हृदयाला सहजा सहजी स्पर्शून जातात. आनंद यादव बोराडे ह्यांच्या बालकथेविषयी लिहितात, ''लहान मुलांच्या दृष्टिकोणातून त्यांनी लिहलेल्या कथा अनुभवाची एक वेगळी छटा पकडतात. ग्रामीण कथेला ती नवीन आहे.''[२८]

अशा प्रकारे बोराडयांच्या कथेतील बालमनोविश्वाचे चित्रण जिवंत आणि प्रत्ययकारी होते ते त्यांनी योजनलेल्या निवेदनामुळे आणि योजलेल्या व्यक्तिरेखांच्या मुखीच्या भाषेमुळे. ही भाषा त्यांच्या कथेतील व्यक्तिमनाची भाषा आहे. ती वरून लादलेली नाही. बालमनाची सगळीच स्पंदने ह्या बोलीतून आकार घेताना दिसतात. ग्रामीण जीवन जगणाऱ्या बालमनाच्या गुंतागुंतीच्या भावस्पदंनाला ग्रामीण बोलीतून योग्य रित्या पकडता येते, ह्या संबंधीची जाण ठेवून बालमनाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या अनेक कथांचे निवेदेकही मुलेच असल्याचे दिसून येते.

### ९. *सुशिक्षित बेकारीचे चटके सहन करणाऱ्या व्यक्तिरेखा :*

परिवर्तनाचा परिणाम, ग्रामीण भागातील राजकारण, समाजकारण, अर्थकारण इत्यादी क्षेत्रांबरोबरच शिक्षणक्षेत्रावरही झालेला दिसून येतो. मात्र त्यामुळे ग्रामीण भाग फारसा बदललेला दिसून येते नाही. फार तर येथे बदलत्या विचाराबरोबर नवे नेतृत्व निर्माण झाले. मात्र असे नेतृत्व स्वार्थी व संधिसाधू बनते व त्यातून तेथील शिक्षणाला विकृत रूप प्राप्त झालेले दिसते. शिक्षण क्षेत्रातील ह्या विकृतीचे दर्शन बोराडयांच्या 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील 'भरती' ह्या कथेतील व्यक्तिरेखेच्या माध्यमातून घडते.

#### *भास्कर*

हा भास्कर पद्व्युतर शिक्षणासाठी औरंगाबादला जाण्याची भाषा बोलून दाखवितो. परंतु त्याचे वडील किसनराव त्याला स्पष्ट खडसावतात, ''आमची मोप तयारी हाय् रं. पर दामाजीची कुठं तयारी हाय? .''[२९] हातावर पोट भरणारे कुटुंब असल्याने आपल्या एम्.ए च्या शिक्षणाला पैसे कोण पुरवणार,

म्हणून भास्कर शिक्षणाचा डाव अर्ध्यावर सोडतो व सुशिक्षितांच्या गर्दीत सामील होतो. नोकरीसाठी अनेक ठिकाणी भटकतो पण नोकरी मिळत नाही. नोकरी सध्यातरी मिळणे मुष्किल व पुढे शिक्षण घेण्याची ऐपतही नाही, अशा प्रश्नाने त्याला वेड लावून सोडले आहे.

एक ना अनेक समस्यांचे ओझे डोक्यावर घेऊन हा भास्कर कथेत संचारताना दिसतो. भास्कर एकदमच चिंताग्रस्त असलेला पाहून त्याचा जिवलग मित्र शिवा (हा सुध्दा सुशिक्षित बेकारच आहे) भास्करला परवाच्या दिवशी औरंगाबादेत मिलिटरी भरती आहे, असे सांगतो. त्यामुळे भास्कर औरंगाबादला भरतीसाठी जाण्याचे ठरवितो. येथे घरातील मंडळी या भरतीला पाठवण्यास तयार नाहीत, तरी देखील बेकार म्हणवून घेण्यापेक्षा भरती बरी, असे म्हणून शिवा व भास्कर हे दोघे औरंगाबादला भरतीसाठी सकाळीसकाळी लवकरच जातात. पुढे भास्करला बेकारीचा जबरदस्त फटका बसतो कसा तो पहा: ''हमको आपको बताते हुऐ खेद होता है की, आज सैनिक भर्ती के लिए नासिकसे जो हाफीसर आनेवाले थे, उनका अभी हमको नासिकसे टेलिफोन आया है। किसी कारण यहाँ सैनिक भरती करनेवाले हाफिसर आज नही आ रहे है। इसलिए आज का सैनिक भरती का प्रोग्रॅम उन्होने कॅन्सल कर दिया है ।.''[३०] असा हा पहिल्या दिवशीचा भरतीचा अनुभव, रात्रभर कुठे रहायचे, खर्चाच्या तरतुदीचे काय करायचे असे प्रश्न त्याच्या समोर असतात.

अखेर भास्कर व शिवा वास्तवाला सामोरे जाण्यासाठी भरतीसाठी आलेल्यांना एकत्र करून नगर पालिकेच्या समोर 'रास्ता रोको' करायचे ठरवितात. त्यांच्या ह्या विचाराला बरीच साथ मिळते औरंगाबाद - पुणे हा राज्यरस्ता दोन्ही बाजूंनी तुंबला गेला. भरती सुरू झाल्याशिवाय रस्तावाहतूक खुली न करण्याचा जवानांचा विचार पाहून पोलीस वरिष्ठांशी सल्लामसलत करून लाठीमार सुरू करतात. भास्कर पोलिसांच्या लाठीमारामध्ये खाली कोसळतो व बेशुध्द होतो. काही वेळा नंतर भास्कर शुध्दीवर येतो. धडपडून उटत अंगातील कळा दाबीत तो इकडेतिकडे पाहतो. सैन्यभरतीसाठी जवळ जवळ सर्वच तरूण पोलिसांचा लाठीमार चुकवीत पळून गेलेले असतात. लाठीमारात जखमी झालेले त्याच्यासारखे काही तरूण मात्र विव्हळत रस्त्याच्या कडेला पडलेले असतात. राज्यरस्त्याची वाहतूकही नेहमीप्रमाणे सुरू झालेली असते.[३१]

अशा प्रकारे सुशिक्षित बेकारांची केली जाणारी प्रत्येक ठिकाणी अवहेलना व समाजजीवनातील शिक्षणाचे घसरते मूल्य आणि शिक्षण क्षेत्राला आलेली मरगळ ह्या कथेतील निवेदकांच्या म्हणजे भास्करच्या तोंडून वाचका समोर आणण्यात बोराडयांच्या लेखनीला भरभरून यश मिळालेल दिसते.

## १०. *मुके प्राणी :*

बोराडे ह्यांच्या कथांमधून व्यक्तींना जसे व्यक्तिमत्त्व प्राप्त होते, तसेच तेथील निसर्ग,शेती, पीके, पाऊस,ऊन, वारा इत्यादी घटकांनाही शेतीच्या अनुषंगाने व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. त्यांच्या कथांमधून कृषिजीवनाशी निगडीत असे अनेक घटक येतात. ह्या इतर घटकांमध्ये 'बैल' हा कृषिजीवनातील आणि परिणामी कृषिसंस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा घटकही कधी स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घेऊन येतो, तर कधी इतर घटकांच्या अनुषंगाने येऊन जातो. काही कथा मधून तर बैल केवळ नायक म्हणून येत नाही तर कृषिजीवनात त्याच्या निमित्ताने निर्माण झालेले भावबंधही घेऊन येतो. 'सत्यानाश' सारख्या कथेमधून बोराडे ह्यांनी अशा भावबंधाचा अंतर्मुख होऊन वेध घेतला असल्याचे दिसते.

*रावळया वासरू*

रावळया वासरू रंगरावच्या कुटुंबाशी, विशेषत: त्याचा मालक रंगराव ह्याच्याशी असेच भावबंध निर्माण करतो.बाबालाल ह्या धर्मांध मुसलमानाने मारून - मारून मरणासन्न व रक्तबंबाळ झालेला हा रावळया तशा अवस्थेत मालकाच्या दारात येऊन पडतो आणि मालक रंगराव ह्याचा हात चाटतच प्राण सोडतो. येथे ह्या वासराला म्हणजे रावळयाला ह्या प्रसंगातून साहजिकच मानवीरूप प्राप्त झालेले दिसते. मालकाला व मालकाच्या कुटुंबियाला जणू अखेरचा निरोप दयायलाच हा आला असावा, असे मनाला वाटू लागते. येथे रावळयाच्या दु:खाने रंगरावचे कुटुंब देखील ढवळून निघालेले आहे, हे दिसून येते. कुटुंबातील एखादा कर्ता पुरूष मरण पावल्यानंतर सर्व कुटुंबाला जसे दु:ख होते, तसे दु:ख येथे रावळया वासराच्या निधनाने रंगराव व त्याचे कुटुंबिय ह्यांना होते. पहा:, "अजीनं डोळयाला पदर लावला, रंगराव मुसमुसून रडू लागला."[३२]

वरील आशय देणारी, किंबहुना थोळावेगळा प्रत्यय देणारी त्यांची 'कणसं आणि कडबा' ही कथा लक्षणीय आहे. ह्या कथेमधूनदेखील सुखदेवबरोबर नांदगावच्या ३०/४० बैलांना व्यक्तिमत्त्व देण्याचा प्रयत्न बोराडयांनी केला आहे. सततचा कोरडा दुष्काळ, ओसाड आणि बोडके माळरान, पाणी नाही की चारा नाही, अशी अवस्था नांदगावच्या शेतकऱ्यांची होते. ह्या समस्येला तोंड देण्यासाठी नांदगावचे काही शेतकरी इतरत्र पोटभरण्यासाठी जातात, तर काही जण आपले बैल आबाराव शेळक्याच्या शेतात नेऊन सोडतात. हे बैल केवळ चारा आणि पाण्यासाठी शेळक्याच्या शेतावर राबताना दिसतात. दुष्काळाचे रौद्र रूप वाढतच जाते. दावणीच्या दावणी बसू लागतात. अशावेळी शेतकरी चिंतेत पडतात आणि सुखदेव सारखे नेतृत्व त्यांना मिळते. हा सुखदेव काहीसा सुशिक्षित आहे. ३०/४० शेतकरी आणि त्यांचे बैल ह्यांना संघटित करून तो शेतकरी संघटना उभारतो.

नांदगावचे बैल आणि त्या बैलांचे मालक ह्यांच्यासह तो तहसीलदार रावळेसाहेबांच्या ऑफिससमोर 'मेख रोखो आंदोलन' करतो. संघर्ष अधिक तीव्र स्वरूपाचा होतो. एक दिवस बैलांचे मालक आणि ३०/४० बैल रावळेसाहेबांच्या ऑफिससमोर बांधले जातात व त्यांच्या शिंगात :

"आम्हाला चारा द्या, आम्हाला पाणी द्या",

"आम्हाला खाऊ नका, आम्हाला खाऊ नका",

"आम्ही जगलो, तरच शेतकरी जगेल",

"चारा जमवा, आम्हाला जगवा"

अशा कागदी पाटया लटकावलेल्या असतात. हे बैल आपली शिंगे हालवून साहेबांचे लक्ष आपल्या न्याय्य मागण्यांकडे वेधून घेण्यात यशस्वी होतात. येथे खऱ्या अर्थाने ह्या कथेत बैलांना मानवी रूप प्राप्त झालेले दिसून येते.

कृषिजीवनात बैलाइतकेच गायीलाही महत्त्व आहे. दूध - दुभते, शेतीला मिळणारी जनावरे इत्यादींसाठी तर गाय शेतीजीवनात महत्त्वाची असते. शिवाय तिच्या संदर्भात काही धार्मिक परंपरा व भावनाही निर्माण झालेल्या आहेत. ह्या धार्मिक परंपरेने तिच्या ठायी तेहतीस कोटी देव बहाल केलेले आहेत म्हणून की काय, बोराडे ह्यांच्या 'कळा' ह्या कथेत गाय कथेतल्या नायिकेचे रूप घेऊन येते.

अशा तऱ्हेने बैल, गाय, कुत्रे, कोंबडया ह्या कृषिनिगडीत घटकांप्रमाणे 'म्हैस' ही बोराडयांच्या कथांमधून चित्रित झालेली आहे. अर्थात ह्या सर्व कथांमधून हे प्राणी महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच त्यांच्या इतर अनेक कथांमधूनही हे प्राणी अपरिहार्यपणे आपले अस्तित्व सिध्द करताना दिसतात आणि ते स्वाभाविकही आहे. कारण ग्रामजीवन हे मुळातच कृषिनिगडीत आहे. म्हणूनच त्यांच्या कथांमधून ह्या घटकांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेल दिसून येते.

## ३.३. समारोप :

रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधील व्यक्तिरेखांचे चित्रण हे रूढ मराठी कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखांच्या चित्रणापेक्षा वेगळे आणि वैशिष्टयपूर्ण आहे, असे जाणवते त्यांच्या कथांमधून मानवी स्वभावाचे आणि जीवनव्यवहाराचे वेगवेगळे पैलू दाखवले जातात. तसेच चित्रित झालेल्या व्यक्ती ह्या समाजातील विविध थरांमधील विविध व्यवसामधील जाती धर्मांमधील आहेत. त्यांचे वर्तन मानवी स्वभावानुसार सहजस्वभाविक असे दिसते. अशा व्यक्तिरेखांचे चित्रण हे कथेच्या आशयानी एकसंघ आणि एकरूप झालेले दिसून येते. त्यामुळे त्यांच्या कथा अधिक प्रभावी व वाङ्मीयनदृष्टया अधिक दर्जेदार होतात.

ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये आपण रा.रं.बोराडे ह्यांच्या ''पेरणी'' (१९६२) व ''कणसं आणि कडबा'' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील व्यक्तिरेखांचा विचार केला आहे. विवेचनाच्या सोयीसाठी ह्या व्यक्तिरेखांचे दहा विभागांमध्ये वर्गीकरण केले आहे, पहिल्या विभागात विरहाच्या दाहकतेमुळे शोकाकुल होणाऱ्या व्यक्तिरेखांचा आपण विचार केला. त्यामध्ये भिकाजी, बायना, बाजी व रानबा अशा व्यक्तिरेखा येतात. दुसऱ्या विभागात पुत्रप्रेमासाठी तळमळणाऱ्या व्यक्तिरेखाचा विचार केला. त्यामध्ये आई व ग्यानाकाका येतात, तिसऱ्या विभागात प्रादेशिक समस्यांशी झुंज देणाऱ्या व्यक्तिरेखांचा आपण विचार केला. त्यामध्ये अण्णाराव तसेच गोविंदा व सिमंता ह्या व्यक्तिरेखा येतात. चौथ्या विभागात मराठमोळेपण जपणाऱ्या व्यक्तिरेखांचा आपण विचार केला. त्यामध्ये आबाराव व जयसिंग्या ह्या व्यक्तिरेखा येतात. पाचव्या विभागात राजकीय इर्षेला पेटलेल्या व्यक्तिरेखांचा आपण विचार केला. त्यामध्ये रंगनाथराव, दादासाहेब व आबासाहेब साबळे ह्या व्यक्तिरेखा येतात. सहाव्या विभागात श्रध्दा - अंधश्रध्दा जोपासणाऱ्या व्यक्तिरेखाचा आपण विचार केला. त्यामध्ये तुका, ग्यनाकाका ह्या व्यक्तिरेखा येतात. सातव्या विभागात शोषक आणि शोषित व्यक्तिरेखांचा आपण विचार केला. त्यामध्ये बाबालाल, रंगराव व आबाराव शेळके ह्या व्यक्तिरेखा येतात. आठव्या विभागात बालमनोविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या व्यक्तिरेखांमध्ये सोन्या, छगन्या, यंका आणि श्रीरंगा ह्यांचा आपण विचार केला. नवव्या विभागात सुशिक्षित बेकारीचे चटके सहन करणारा भास्कर आणि अखेरच्या दहाव्या विभागात मुक्या प्राण्यांच्या व्यक्तिरेखांमध्ये रावळया वासरू चा आपण विचार केला. ह्या सर्व व्यक्तिरेखांच्या चित्रणात बोराडयांचा व्यापक सहानुभाव व मानतावदी भूमिका ह्यांचे प्रत्यंतर येते. बोराडे कथाकार म्हणून ह्या सर्व चित्रणात कुठे ही भाष्य करीत नाहीत. त्यांच्या कथाकार म्हणून असलेल्या जीवनदृष्टीचे आविष्करण मात्र नकळतपणे चित्रणातून होते. प्रसंग, निवेदन, संवाद, आत्मसंवाद, चिंतन, बारीकसारीक,तपशील ह्यांच्या माध्यमातून बोराडे त्या त्या व्यक्तिरेखेच्या अंतरंगाचे दर्शन घडवतात. त्यांच्या ह्या सर्व व्यक्तिरेखा ह्या केंद्रीय आशयाशी निगडीत असल्यामुळे त्या आशयापासून वेगळया काढता येत नाहीत.

----------: ❋❋❋❋❋ :----------

# संदर्भ व टीपा:

*(जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमावृत्ती समजावी.)*


१. बोराडे रा. रं., ''उताराची वाट'', 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९४, पृ. १५ - १६

२. तत्रैव, पृ. १७

३. पहा: बोराडे रा. रं., ''हुरडा'', 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,१९६२, पृ. ६१ - ६५

४. तत्रैव, पृ. ६५

५. पहा: तत्रैव., ''हुंदका'', तत्रैव, पृ. १०२ - ११०

६. तत्रैव, पृ. १०९

७. पहा: तत्रैव, ''अभ्यास'', तत्रैव, पृ. ९२ - १०१

८. तत्रैव, ''झाड'', तत्रैव, पृ. १३६ - १४३

९. तत्रैव, ''काळीज'', 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९४, पृ. ३४ - ३८.

१०. पहा: तत्रैव, ''अवर्षण'', ''पडझड'', 'कणसं आणि कडबा', तत्रैव, पृ. ९३ - ९८, १३३,१४०

११. तत्रैव, ''आवर्षण'', तत्रैव, पृ. ९४

१२. तत्रैव, पृ. ९८

१३. बोराडे रा. रं., ''ताण'', 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,१९६२, पृ. ४१

१४. तत्रैव, ''खानदान'', तत्रैव., पृ. १३४

१५. तत्रैव, ''वेस'', 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९४, पृ. ८३

१६. पहा: तत्रैव, ''काळीज'', तत्रैव, पृ. ३४-३८

१७. पहा: तत्रैव, ''पोतेरा'', तत्रैव, पृ. १४१-१४८

१८. तत्रैव, पृ. १४१ - १४८

१९. पहा: बोराडे रा. रं., "सांगावा", "झाड", 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,१९६२, पृ. ५० - ६०, ३६ - ४३

२०. तत्रैव, "सांगावा", तत्रैव, पृ. ५५

२१. तत्रैव, "झाड", तत्रैव, पृ. १३७

२२. पहा: तत्रैव, "सत्यानाश", तत्रैव, पृ. ८५ - ९१

२३. तत्रैव, "कणसं आणि कडबा", 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९४, पृ. ९९ - १०७

२४. पहा: तत्रैव, "अभ्यास", उनि., पृ. ९१ - १०१

२५. पहा: तत्रैव, "भल्या घरचे पाहुणे", 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. ६६ - ९४

२६. पहा: तत्रैव, "सांगावा", उनि., ५०- ६०

२७. पहा: तत्रैव, "झाड", उनि., १३६- १४३

२८. यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीवृत्ती: १९९३, पृ. २३

२९. बोराडे रा. रं., "भरती", 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९४, पृ. १०४

३०. तत्रैव, पृ. ११४

३१. तत्रैव, पृ. ११६

३२. तत्रैव, "सत्यानाश", 'पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे,१९६२, पृ. ८९

----------: ❁❁❁❁❁ :----------